महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
उत्सव इमारत,शिवनेरी पथ,बिबवेवाडी,पुणे-३७
Email - asakpal@punecorporation.org
दुरध्वनी क्र. - 020-25508700
जा.क्र. ४८३४ दि.- १५/११/२०१८

## अपिलाची सुनावणी

अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त/वृक्ष अधिकारी, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या प्राधिकरणासमोरील कामकाज.

दिनांक - १५/११/२०१८ दिनांक – दुपारी ०३.३० वा.

**स्थळ** - महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, उत्सव इमारत, शिवनेरी पथ, बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७.

प्रति,

**श्री.नरेश गुलाब चव्हाण**
३९, औंध रोड,
२०१, रोशनचंदा कांबळे वस्ती,
वाल्मीकीनगर, पुणे ४११०२०. } **अपिलार्थी**

**श्रीमती श्रृती गावडे**
महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका. } **जनमाहिती अधिकारी तथा** सहा.वृक्ष अधिकारी

**माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल**

श्री.नरेश गुलाब चव्हाण (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांचा माहिती अधिकारातील दिनांक ०७/०८/२०१८ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा सहा.वृक्ष अधिकारी , महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका (यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिले जातील) यांना दिनांक ०७/०८/२०१८ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी अनधिकृत वृक्षतोड केल्याबाबत पंचनाम्यावर केलेल्या कायदेशीर कारवाईची माहिती विचारलेली होती

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जाचा दिनांक | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक | विलंब दिवस |
| ०७/०८/२०१८ | ०७/०८/२०१८ | ०५/०९/२०१८ | - | - |

अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती न मिळाल्याने त्यांचा अपिल अर्ज दिनांक ०८/१०/२०१८ रोजी अपिल अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त/वृक्ष अधिकारी, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे प्राप्त झाला.

| अपिल अर्जाचा तपशील | | |
|---|---|---|
| अपिल अर्जाचा दिनांक | अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक |
| ०८/१०/२०१८ | ०८/१०/२०१८ | अपिल अर्ज मुदतीत आहे. |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ - दि.१५/११/२०१८ रोजी दुपारी ०३.३० वा.
सुनावणीस अपिलकर्ता - अनुपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी व सहा.जनमाहिती अधिकारी - उपस्थित

**जनमाहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील -**

| विचारलेल्या माहितीचा तपशील | दिलेल्या माहितीचा तपशील |
|---|---|
| पुणे महानगरपालिका उद्यान विभागाने महर्षिनगर चाळ नं.६३/४९६, पुणे ४११०३७ येथील अनधिकृत वृक्षतोडीचा पंचनामा दि.३०/०४/२०१८ रोजी प्रत्यक्ष घटना स्थळी येवून केलेला होता व आहे. पंचनामा केल्यानंतर त्यासंदर्भात पुढे नेमकी कोणत्या प्रकारची कायदेशीर कारवाई संबंधित वृक्षतोड करणाऱ्यावर आपल्या खात्याने केलेली आहे व करत आहे याबाबतची सर्व माहिती सर्व कायदेशीर कागदपत्रांसह, टिपणांसह साक्षांकित करून मिळावी. तसेच सदर पंचनाम्याची प्रतही साक्षांकित करून मिळावी. | अर्जदारास माहिती देणेत आलेली नाही. |

सदर सुनावणीस अपिलार्थी श्री.नरेश गुलाब चव्हाण हे अनुपस्थित होते. परंतु, श्री.चव्हाण यांनी सुनावणी पुर्वी कार्यालयात समक्ष भेटून त्या अपिल अर्जाबाबत चर्चा करून त्यांच्या अनुपस्थित अपिल आदेश पारित करणेबाबतचे लेखी निवेदन या कार्यालयाकडील आवक क्र.६०८८ दि.१३/११/२०१८ अन्वये सादर केले आहे. सदर दिनांकास श्रीमती श्रृती गावडे, जनमाहिती अधिकारी तथा सहा.वृक्ष अधिकारी, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका या उपस्थित होत्या. तसेच श्री.देविदास भुजबळ, सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा हॉट्रीकल्चर मिस्त्री हे उपस्थित होते.

अपिलार्थी श्री.नरेश गुलाब चव्हाण यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वयेच्या त्यांच्या अर्जातील पुणे महानगरपालिका उद्यान विभागाने महर्षिनगर चाळ नं.६३/४९६, पुणे ४११०३७ येथील अनधिकृत वृक्षतोडीचा पंचनामा दि.३०/०४/२०१८ रोजी प्रत्यक्ष घटना स्थळी येवून केलेला होता व आहे. पंचनामा केल्यानंतर त्यासंदर्भात पुढे नेमकी कोणत्या प्रकारची कायदेशीर कारवाई संबंधित वृक्षतोड करणाऱ्यावर आपल्या खात्याने केलेली आहे व करत आहे याबाबतची माहिती न मिळाल्याने त्यांनी प्रथम अपिल अर्ज दाखल केलेला आहे.

वरीलप्रमाणे संबंधित जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले त्यानुसार मी, अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आह

**<u>अपिल अधिकारी यांनी सदर सुनावणीमध्ये केलेले 'आदेश'</u>**

➢ जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अधिकार अर्जात व अपिल अर्जात नमूद केल्यानुसार पुणे महानगरपालिका उद्यान विभागाने महर्षिनगर चाळ नं.६३/४९६, पुणे ४११०३७ येथील अनधिकृत वृक्षतोडीचा पंचनामा दि.३०/०४/२०१८ रोजी प्रत्यक्ष घटना स्थळी येवून केलेला होता व आहे. पंचनामा केल्यानंतर त्यासंदर्भात पुढे नेमकी कोणत्या प्रकारची कायदेशीर कारवाई संबंधित वृक्षतोड करणाऱ्यावर आपल्या खात्याने केलेली आहे व करत आहे याबाबतची मागविलेली माहिती पुढिल ८ दिवसात अपिलार्थी श्री.गुलाब नरेश चव्हाण यांना उपलब्ध करून देणेत यावी. तसेच यापुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त अर्जांची परिपूर्ण स्वरूपातील माहिती जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास विहित मुदतीत उपलब्ध करून देणेची दक्षता घ्यावी.

कळावे,

15/11/18

(अविनाश सकपाळ)
**अपिलीय अधिकारी** तथा
**महापालिका सहाय्यक आयुक्त/वृक्ष अधिकारी**
बिबवेवाडी कार्यालय
पुणे महानगरपालिका.

<u>टिप –</u>

१. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या आत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे – ४११००१ यांचेकड व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.
२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत <u>www.punecorporation.org</u> या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत –

१. श्री.नरेश गुलाब चव्हाण, ३९, औंध रोड, २०१, रोशनचंदा कांबळे वस्ती, वाल्मीकीनगर, पुणे– ४११०२०.
२. श्रीमती श्रृती गावडे, जनमाहिती अधिकारी तथा सहा.वृक्ष अधिकारी, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.
३. श्री.देविदास भुजबळ, सहा.जनमाहिती अधिकारी तथा हॉट्रीकल्चर मिस्त्री, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.